**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०००३२.**

**दिनांक :- १९ ऑगस्ट, २०१५.**

**अधिसुचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

**क्रमांक-टिपीएस-१२१४/३९५/प्र.क्र.५२/१५/नवि-१२.**

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना "असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम"असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१ (१) अन्वये शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस-१२९७/१३१९/प्र.क्र.१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर, १९९९ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे)अन्वये मंजूर झाली असून,ती दिनांक २२ नोव्हेंबर,१९९९ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेच्या प्रस्तावानुसार मौ. माजिवडे येथील स. नं. २६९/१अ, २६९/१ब, २७०, ४०८, ४२१/१, ४२१/२ या जमिनी ४० मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावाने बाधीत होत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) व सदरहू विकास योजना रस्त्याच्या दक्षिणेस अस्तीत्वातील रस्ता असुन तो अस्तीत्वातील रस्ता म्हणून उक्त विकास योजनेमध्ये दर्शविण्यात आला आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अस्तीत्वातील रस्ता" असा करणेत आला आहे.);

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेने (यापुढे ज्याचा उल्लेख" उक्त महानगरपालिका "असा करण्यात आला आहे ) उक्त अधिनियमातील कलम ३७ (१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन उक्त जमीनी ४० मी. रुंद प्रस्तावित विकास योजना रस्ता प्रस्तावामधून वगळून त्याखालील जागा वन व रहिवास विभागात समाविष्ट करण्याचा व उक्त अस्तीत्वातील रस्त्याची रुंदी ३० मी. करण्याचा फेरबदलाचा प्रस्ताव दिनांक २९/९/२००९ च्या पत्रान्वये शासनाच्या मंजूरीकरीता सादर केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल काही बदलासह मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आणि त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये शासनास प्रदत्त असलेल्या शक्तींचा वापर करुन शासन उक्त फेरबदल प्रस्ताव काही बदलासह मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजूरीच्या अधिसुचनेतील फेरबदलाच्या अनुसुचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे;

**नोंद**

"ब-ड-क" या आद्याक्षरांनी दर्शविल्याप्रमाणे प्रस्तावित ४० मी. रुंद विकास योजना रस्ता वगळून त्याखालील भागश: क्षेत्र वन व भागश: क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. "अ-ब" या आद्याक्षरानी दर्शविलेला रस्ता मंजूर विकास योजनेनुसार ४० मी. रुंदीचा कायम ठेवण्यात येत आहे. "ब-क" या आद्याक्षरांनी दर्शविलेला रस्ता ३० मी. रुंदीचा करण्यात येत आहे. सदरचे मंजूर फेरबदल विकास योजना भाग नकाशामध्ये दर्शविण्यात आले आहेत."

०२. सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

०३. उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधी करिता उपलब्ध राहील.

१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

२) सहसंचालक नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

३) सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, जि.ठाणे.

०४. सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

**(सुनिल फाटक)**
**कार्यासन अधिकारी**

D/KALAM/ADISUHNA २०१२

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**URBAN DEVELOPENT DEPARTMENT**
**4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai-400032.**
**Dated :- 19th August, 2015**

## NOTIFICATION

**No. TPS-1214/395/CR-52/15/UD-12,**

Maharashtra Regional and Town planning Act, 1966

Whereas, the Revised Development Plan of the city of Thane (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned by the Government in the Urban Development Department , under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, ( hereinafter referred to as "the said Act") vide Notification No. TPS/1297/1319/CR-148/97/UD-12, Dt. 4th October, 1999 (hereinafter referred to as "the said Notification ") and has come into force with effect from 22nd November 1999;

And whereas, in the said Development Plan, lands bearing S. Nos. 269/1A, 269/1B, 270, 408, 421/1, 421/2 of village Majiwade are affected by the proposed 40 mt. wide Development Plan Road proposal (hereinafter referred to as "the said lands") and the existing road towords the South of the aforesaid Development Plan road is shown as the existing road in the said Development Plan (hereinafter referred to as "the said Existing Road");

And whereas, Thane Municipal Corporation (hereinafter referred to as " the said Corporation"), after following the legal procedure under sub-section 1 of section 37 of the said Act, has submitted a proposal for modification in the said Development Plan so as to delete the said lands from the 40 mt. wide proposed road and the lands so released is proposed to be included in Forest and Residential Zone and the width of the said Existing Road to be widened upto 30.00 m. vide letter dated 29th September, 2009 (hereinafter referred to as "the said Modification");

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to sanction the said modification with some changes;

Now therefore, in exercise of the powers conferred under sub section (2) of section 37 of the said Act, the State Government hereby sanctions the said modification proposal with some changes as described below:-

" In the Schedule of modifications appended with the said Notification, after the last entry, the following new entry shall be inserted viz. :-

**ENTRY**

"The Proposed 40 mt. wide Development Plan Road as shown "B-D-C" is deleted and land so released is included partly in Forest Zone and partly in Residential Zone. 40 mt. wide Development Plan Road as shown "A-B" is kept intact as per the sanctioned Development Plan. The width of the Existing road as shown "B-C" is increased to 30 mt. All these sanctioned modifications are shown on the part plan of the Development Plan."

**02.** The date of publication of this Notification in the Maharashtra Government Gazette is fixed as the date of coming into force of this sanctioned modification.

**03.** The part plan of the said sanctioned modification shall be made available for inspection to the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month:-

i) The Commissioner , Thane Municipal Corporation, Thane.

ii) The Joint Director of Town Planning, Konkan division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

iii) The Assistant Director of Town Planning ,Thane Branch, Thane.

**04.** This notification shall also be published on the Government Website at www.maharashtra .gov.in.

**By order and in the name of the Governor of Maharashtra.**

**(Sunil Phatak)**
**Section Officer**